# भारतातील स्वयंपूर्ण खेडयांच्या संकल्पनेत बलूतेदारांची सदय स्थिती

## मनिषा अ. कुलकर्णी

**सारांशः** भारत देश शेती प्रधान देश म्हणून ओळखल्या जातो. जवळपास 65 टकके लोक जीवनाचा आधार या व्यवसायावर शोधत असतात. 1947 मध्ये भारत इंग्रजांपासून स्वतंत्र झाला पण ग्रामिण लोकांचे जीवन स्वयंपूर्ण न रहाता परावलंबी बनत गेले. भारतीय अर्थव्यवस्था आजही ग्रामिण अर्थव्यवस्थेवर अवलंबून आहे.

***प्रस्तावना :***

पूर्वी खेडी स्वयंपूर्ण होती गावातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती व शेतीला पूरक असे उघोगधंदे होता. पैशांचा शोध लागण्यापूर्वी वस्तू विनिमयाची अर्थव्यवस्था ग्रामिण भागात अस्तित्वात होती. वस्तूविनिमयाची अर्थव्यवस्था हि गावातल्या गावात आवश्यक त्या गरजा पूर्ण करणारी होती. स्वातंत्र्योत्तर काळानंतर औघोगिकीकरणाचे पर्व सुरू झाले आणि या वस्तूविनिमय अर्थव्यवस्थेचा शहरी भागासोबतच ग्रामिण भागातही लोप पाहावयास मिळाला. सदय स्थितीत पूर्वीची स्वयंपूर्ण खेडी ही परावलंबी होत असून ग्रामिण भारताचा कणा असलेल्या कृशी क्षेत्राच्या प्रगतीचा झपटयाने–हास होत असल्याचे दिसून येते.

***निबंधाचे उद्देश***

1. ग्रामिण भागातील मुळ अर्थव्यवस्थेचा अभ्यास करणे
2. स्वयंपूर्ण खेडयांची संकल्पना मांडणे व अभ्यासणे
3. बलुतेदारी पध्दतीचा अभ्यास करणे

***महत्वाच्या संकल्पनाः–***

1. स्वयंपूर्ण खेडी :–गावातील प्रत्येक गरजा गावातील व्यक्तिकडून वस्तूरूपात किंवा सेवेच्या रूपातून पूर्ण होणारी अर्थव्यवस्था म्हणजे स्वयंपूर्ण खेडी.
2. बलूतेदार :–ग्रामिण भागातील जे कामगार/कारागीर शेतक–यांच्या महत्वाच्या गरजा भागवतात व निरनिराळी शेती व इतर उघोगाच्या संबंधाने आवश्यक असणारी कामे वस्तू अथवा सेवेच्या मोबदल्याने करून देतात त्यांना बलूतेदार असे म्हणतात.
3.बलूतः– गावातील शेतक–यांच्या प्रापंचिक व व्यावसाईक कामे वर्षभर करून देण्याबद्दल बलूतेदाराला सूगीच्या दिवसात धान्य स्वरूपात देण्यात येणारा मोबदला म्हणजे बलूत.
4. परंपरागत व्यवसाय :–वडिलोपार्जित चालत आलेला व्यवसाय पुढच्या पिढीने जशाचा तसा सांभाळणे म्हणजे परंपरागत व्यवसाय.
5. वस्तूविनिमय प्रणालीः– जेंव्हा एका वस्तूच्या मोबदल्यात दूसरी वस्तू व सेवा देण्यात येते त्याला वस्तूविनिमय असे म्हणतात.
6. उत्पन्न :–संपत्तीच्या उपयोगातून निर्माण होणारा व मानवी श्रमांच्या मोबदल्यात मिळणारा पैशच्या व अन्नसामुग्रीच्या स्वरूपातील लाभ.
7. शेतीपूरक व्यवसायः–शेतीसाठी आवश्यक असणारा सेवा व वस्तू पुरविण्याच्या व्यवसायास शेतीपूरक व्यवसाय असे म्हणतात.
8. स्थलांतरण : निवासाचे व्यवसायाचे एक ठिकाण सोडून मानव/व्यक्ति दिर्घकाल वास्तव्याकरीता दूस–या ठिकाणी जातात या हालचालीस स्थलांतरण असे म्हणतात.

***शोध निबंध पध्दतीचे विवेचन***

***प्राथमिक पध्दत***

1. संशोधनः– विविध जिल्हातील ग्रामिण भागातील लोकांचे व्यवसाय शेती व उघोगधंदे यांचा अभ्यास करून माहीती संकलीत केली आहे.
2. प्रश्नावलीः– विविध प्रकारच्या बलूतेदारांकडून त्यांच्या बाबत आवश्यक असणारी माहीती मिळवली आहे.
3. निरिक्षणः– संशोधना दरम्यान बलूतेदारांच्या विविध पध्दतींचे व्यव्हारांचे परिक्षण केले आहे. त्यांची सदय परिस्थिती आणि व्यवसायाचे स्वरूप पाहून निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

***व्दितीय पध्दत :–***

***संदर्भ ग्रंथ व नियतकालीकेः–***

संशोधनासाठी आवयश्यक संबंधित वेगवेगळया संकल्पना, व्याख्या, वैशिश्ठये व मुळ संकल्पना स्पष्ट करण्यासाठी संदर्भ ग्रंथांचा विचार करण्यात आला आहे.

***प्रास्ताविक :***

भारतीय इतिहास व अर्थव्यवस्थेचा अभ्यास करताना असे दिसून आले आहे की, पूर्वी भारतातील खेडी स्वयंपूर्ण होती. गावातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती व शेतीला पूरक उदयोगधंदे असा होता. शेती व्यवसायासाठी लागणारे साहीत्य, अवजारे व हत्यारे बनविणे व दुरूस्त करणे शेतीशी निगडीत छोटी मोठी कामे करणे हे बलूतेदारांचे काम होते. या पध्दतीने ग्रामिण अर्थव्यवस्था विकसीत झालेली होती.

ग्रामिण भागातील अर्थव्यवस्था ही वस्तूविनिमय पध्दतीवर अधारीत होती. पैशांचा शोध लागण्यापूर्वी शेतकरी आपल्या शेतातील कामे करून देण्या–याला व शेतीला लागणारी अवजारे व सेवा पूरविणा–याला शेतात पिकणारे धान्य मोबदला म्हणून देत असत. या व्यवसायाचा पाया बलूतेदारी होता. खेडयातील लोकांच्या आवश्यक दैनंदिन गरजा पूर्ण करण्याकरीता स्वतंत्र व्यवस्था होती. कौशल्यपूर्ण मनुष्यबळ या बलूतेदारांच्या रूपात गावातच गावातील गरजा पूर्ण करीत असत. हे सर्व बलूतेदार आपआपल्या कामात आवश्यक कौशल्यपूर्ण असल्याने गावातील गरजा गावतच भागविण्याचे व पूर्ण करण्याचे बळ त्यांच्यात होते.

बलूतेदारी पध्दतीचे अस्तित्व आर्यकाळापासून भारतात असल्याचे दिसून येते. वस्तू विनिमयाची हि पध्दत आपल्याकडे 20 व्या शतकाच्या उत्तरार्धातही चालू होती. बलूतेदारांना पूर्वी कारू नारू असे संबोधण्यात येत असे. कामाच्या महत्वाप्रमाणे बलूतेदारांचे तिन वर्ग केलेले आहेत. परंतू हि वर्गवारी विविध ठिकाणी वेगवेगळी असल्याचे दिसून येते.

पहिला वर्गः– 1. सुतार, 2. लोहार, 3. चांभार, 4. मांग,
दुसरा वर्ग :– 5. न्हावी, 6. परिट, 7. कुंभार , 8. कोळी
तिसरा वर्ग :– 9. गुरव, 10. सोनार, 11. मुलाणी, 12. जोशी

पुष्कळ ठिकाणी महार हा बलूतेदारांच्या यादीत समाविष्ट केल्या गेल्याचे दिसून येते. चौगूला, तराळ , बुरूड असे आणखी कांही बलूतेदार सुध्दा या यादित असल्याचे दिसून येते.

बलूतेदारांचा दर किंवा निरख वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळा असुन सदर दर हा नेहेमी करीता निश्चित असल्याचे दिसून येते. विविध सणांच्या निमित्याने बलूतेदारांना अधिकचा मोबदला धान्य, भाकरी, तेल, मिठ, गुळ अथवा इतर पदार्थांच्या माध्यमाने देण्याची पध्दत होती.

शेतीच्या कामांकरीता अवजारे बनविणे, दुरूस्त करणे यासाठी सुतार लोहार, चांभार मांग यांची गरज शेतक–यांना भासत असे. बलूतेदारांची हि सेवा शेतक–या कडे वर्शभराची उधारी असायची, यामूळे सुगीच्या दिवसात पहीला मान बलूतेदारांचा. वर्शभराची उधारी याच काळात वसूल होत असल्यामूळे प्रत्येकाच्या कामाच्या प्रमाणात शेतकरी सढळ हाताने या सगळयांना बलूत देत असे. बलूतेदारानेच सुगीत मदत केलेल्या धान्यातला आपला हिस्सा बांधायचा व शेतक–याने त्याला तो डोक्यावर उचलून देण्यास मदत करायची यात कधीही कुठलाही शेतकरी हात आखडता घ्यायचा नाही व दुजा भाव सुध्दा करायचा नाही. गहू ज्वारी, भात, कडधान्य, शेंगा अस थोड थोड सगळ दिल जायच. गावातल्या

मुसलमानालाही घासातला घास देण्याची शेतकरी व गावगाडयाची रित होती आणि त्याच मूळे खेडी स्वयंपूर्ण होती. आता हे सगळं इतिहास जमा झाल आहे.

***ग्रामिण भागातील बलूतेदार आणी सदय स्थिती :—***

1. सुतार :— पेरणीच्या काळात औतापासून बैलगाडीच्या चाकांच्या खुंटया पर्यंत लाकडाचे साहीत्य तयार करण्याची कला सुताराकडे होती. अगदी शेतात पेरणी सुरू असताना शेतात पाभर चालताना फणा मोडला तर लगेच सुतार शेतात जाऊन जागच्या जागी ते काम तत्परतेन करून देत असे. घर बांधताना माळवद तयार करणे खिडक्या व दारे तयार करून आणून बसवून देणे हे सूताराचेच काम होते.

परंतू आजच्या परिस्थितीत सुताराचे काम अगदी दुरूस्ती पुरतेच उरले आहे. लोखंडी नांगर बैलगाडया आणि अत्याधुनिक मशिन्स व अवजारांमुळे कुळवाची दांडू नांगराच्या दांडया फण बनवायची किंवा कांही किरकोळ दुरूस्तीची तेवढी कामे सुतार करतो.

घरासाठी लागणारे साहित्य तर सुताराकडे तयार करताना दिसूनच येत नाही. घराला माळवदाच्या ऐवजी सिमेंट कॉंक्रिटचे छत लाकडी खिडक्यां ऐवजी लोंखंडी काचेच्या खिडक्या व दारांच्या ऐवजी वॉटर प्रुफ, हार्ड बोर्ड चे काराखान्यातून तयार होणारे दार शहरी भागाबरोबर ग्रामिण भागातही आयात होताना दिसून येत आहे.

2. लोहार :— सुगीसाठी उन्हाळयापासूनच लोहाराचे काम सुरू व्हायचे. विळा, कु—हाड, कोयता बनविणे जुन्या साहीत्याला धार लावणे या कामात लोहार व्यस्त असायचे. बैलगाडीच्या चाकाला लोंखडी पट्टी लावून मजबूत करणे हे सुतारानंतर लोहाराचे काम असायचे. लोहाराचा भाता या कामासाठी नेहेमी तयार असायचा. परंतू वेल्डींग मशिन मुळे आता लोखंडी औत, ट्रॅक्टर व ग्रामिण भागात आयात होणा—या लोखंडी साहीत्याने लोहाराचे कामच संपवले आहे. आता फक्त अवजारांना धार लावण्या करीता लोहाराचा भाता चालताना दिसून येतो.

3.चांभार :— चांभार हा गावातील मुख्य बलूतेदारांपैकी एक होता.चपला, जोडे, मोट , पखाली व इतर चामडयाच्या वस्तू तयार करण्याचे काम चांभाराचे होते. गावातील किंवा आजूबाजूच्या परिसरात मेलेल्या जनावरांपासून मिळालेल्या चामडयाच्या चपला, जोडे कौशल्यपूर्ण तयार करून वस्तूंच्या मोबदल्यात त्या घराघरात पुरविण्याचे काम चांभाराचे होते. शेतातल्या विहीरीतील पाणी उपसण्याकरीता मोट व नदीवरून पाणी घराघरात पोहचवण्यासाठी पखाली उपयोगात येत असत.

परंतू औघोगिकरणानंतर रबर प्लास्टीक व वेगवेगळया साहीत्याचा वापर करून चपला बुट मोठया प्रमाणात तयार होत आहेत सदर वस्तूंच्या किंमती तूलनेने स्वस्त असल्याने चांभाराच्या व्यवसायावर मर्यादा आल्याचे दिसून येते. शेतात पाणी देण्या करीता आता मोट इतिहास जमा झाली आहे. विज व इतर इंधनावर चालणारे पंप उपलब्ध झाल्याने या संबंधाने चांभारास असलेले काम बंद झाले आहे.

4. मांग :— सणासुदीला दाात तोरण बांधणे, बैल पोळयाला पिपाणी वाजविणे सुगीच्या वेळी ओझे उचलण्याचे काम करणे, दो—या वळणे आणि केरसुणी बनविण्याचे काम मांग करायचा. घर व घरा बाहेरचा परिसर स्वच्छ ठेवणे हे काम या बलूतेदारचे होते.

का बाजारात काराखान्यात तयार होणा—या नायलॉनच्या दो—या ,केरसुणी आणी टेपरेकॉर्डवर वाजणारे संगित आले आणि या समाजाचे काम कमी झाले .आता मजुरी हे त्यांच्या उपजिवीकेचे साधन बनले आहे.

5. न्हावी :— घराघरात जाऊन , गावातल्या पारावर बसून पुरूषांचे केश कर्तनाचे काम न्हावी समाजाचे होते.

हा समाज आजही शहरी भागात व ग्रामिण भागात परंपरागत व्यवसायात अत्याधूनिक पध्दतीने काम करताना दिसून येतो. ग्रामिण भागात मात्र परंपरागत पध्दतीने सदर व्यवसाय बंद पडून आता सदर व्यवसाय दुकांनांच्या माध्यमातून करण्यात येत असल्याचे दिसून येते.

6. परिट :— नदीवर किंवा तलावावर गावातील मोठमोठया व श्रीमंत लोकांची कपडे धुवून व इस्त्री करून त्याच्या मोबदल्यात त्यांना बलूते देण्याची पध्दत होती.

आज कपडे धुण्याचे मशीन, कमी उत्पन्न असणा—यांच्या घरातील बायका धुण्या—भांडयांची काम करून देत असल्याने व कपडे धुणे , इस्त्री करणे हा व्यवसाय परिट समाजा व्यतिरिक्त बरेच लोक हा व्यवसाय करताना दिसून येतात. त्यामुळे हा समाज स्वतःचे अस्तीत्व टिकवण्यासाठी मोठया कष्टाने पाय रोऊन उभा आहे.

7. कुंभार :— कुंभार संक्रांतीच्या कामापासून कामाला सुरूवात करायचा आणि त्याच्या सुगीला सुरूवात व्हायची. उन्हाळयात गार पाणी देण्यासाठी माठ बनवणे, देवी देवतांच्या मूर्ती, बैल पोळया करीता मातीचे बैल, मातीची खेळणी, पाणी साठविण्याचे मोठमोठे रांजण आणि मयतांच्या विधी करीता लागणारे मडके बनविण्याचे काम कुंभाराचे असायचे.

परंतू आता कुंभार या शब्दाची ओळख इतिहास जमा होते कि काय अशी परिसिथिती आहे. परराज्यातून किंबहुना परदेशातून आयात होणा—या प्लास्टर ऑफ पॅरिस व संगमरवरांच्या मूर्ती ,नवनवीन प्रकारचे ढिगानी दिसनारे लाल मातीचे माठ ,झाडांच्या कुंडया आणि शोभेच्या वस्तू व पाणी साठविण्या करीता प्लास्टीक च्या टाक्या, सिमेंटचे हौद त्यामूळे कुंभाराच परंपरागत कामच कमी झालेल आहे. मयतीच्या दुकानातच मिळणार तयार मडकं यातच कुंभार पूर्ण खचून गेला. त्याच्याच कुंभार वाडयातल्या मातीत कधीही वर न येण्यासाठी.

8. कोळी :—कोळी समाज हा नदीकाठच्या गावात मासे गोळा करणे, नदीवरून पाणी पखालीने घराघरात पोहचवणे व रानातल्या गुडमईच्या काडया जमा करून त्याच्या मजबूत पाटया बनवायच्या व त्या पाटया शेण काढणयासाठी उपयोगात यायच्या.

आजही नदीकाठच्या गावी कोळी समाजाला रोजगार उपलब्ध आहे तोही फकत मासे गोळा करण्या इतपत पण इतरत्र असलेला कोळी समाज स्वतःचा मूख्य व्यवसाय सोडून वेगवेगळी कामे शोधण्यासाठी स्थलांतरीत झाला आहे.

9. गुरव :— हि लोक हिंदु धर्माच्या मंदिरातील साफसफाई करणे,देवाचे वस्त्र धुणे, बेलफुले आणणे अशी काम करायची.आजही हा समाज मोठया प्रमाणात अस्तित्वात आहे.

आजच्या परीस्थितीत या समाजाचे काम ग्रामिण भागात पुर्वीपेक्षा कमी झालेले दिसते.पण शहरी भागात जागोजाग उभ्या राहिलेल्या मंदिरात काम करण्यासाठी मोठया प्रमाणात स्थलांतरीत झाला आहे.

10. सोनार :—अत्यंत कलाकुसरीने सोने,चांदि या मौल्यवान धातू पासून दागिने बनवण्याचे काम सोनाराचे. हा यांचा मुख्य व्यवसाय या व्यतिरीक्त अडिनडीला गावातील लोकांना अर्थसहाय्य करण्यातही यांचा सहभाग असे.

शहरात मोठमोठया पेढयांमध्ये शुध्दतेच्या प्रमाणित व नविन सुबक कलाकृती असलेल्या दागिन्यामुळे ग्राहक वळतांना दिसत नाहि.

11 . मुलाणीः— गावातील स मुस्लिम धर्मातील दैविक कामे करूण देण्याचे काम मुलाणी समाजाचे.मस्जिद मध्ये नमाज पढवणे,निकाह लावणे हि कामे या समाजाची.

आजच्या स्थितीत यांचीहि परिस्थिती इतर बलूतेदारांप्रमाणेच आहे.

12.जोशी :— गावातील सर्व हिंदु धर्मातील पौराणीक व दैविक कामे करूण देण्याचे काम जोशी म्हणजेच ब्राम्हण समाजाचे. गावातील सर्व देव धर्माचे काम करणे,लग्न लावणे व अशीच सर्व काम करण्यात हा समाज व्यस्त असायचा.त्यात त्यांचा उदरनिर्वाह व्यवस्थित चालत असे.

काळ बदलत गेला ग्रामिण भागातील उत्पन्नात उदरनिर्वाह करणे कठीण झाले शहरात देव धर्माच्या कामा साठी मागेल तेवढा पैसा मिळायला लागला आणि या समाजाला शहराची ओढ लागली. आज ग्रामिण भागात दोन चार गावांना मिळुन एखादा पौरोहित्य करणारी व्यक्ति आढळून येतो.

ग्रामिण भागातील स्वयंपूर्ण अर्थव्यवस्था आणि बलूतेदारीचा गाडा जागेवरच थांबला आणि प्रत्येक जण परावलंबी जीवन व पैसा या मागे धावतो आहे. मग शेतक—यालाहि आधुनिक शेती व पैशावर काम करवून घेण भाग पडलं. उधारीच बलुतं,बलुतेदाराच आणि शेतक—यांमधील विश्वासाची व प्रेमाच्या नात्याची जागा पैशानी घेतली आणि हे सगळ आपल्या समोर संपुश्टात आल.

परंपरागत उघोग वाढत्या मागणीमुळे जात धर्म पंथ याचा विचार न करता नवनविन उघोजकांनी सुरू केले. दळणवळणाच्या सोई वाढल्यामूळे उपजिवीकेसाठी ग्रामिण भागातील लोकांचे शहराकडे स्थलांतरण झाले पर्यायाने परंपरागत बलूतेदारी पध्दत क्वचितच पूर्णपणे ग्रामिण भागात निदर्शनास येते. महात्मा गांधींच्या स्वयंपूर्ण खेडयांच्या संकल्पनेत बलूतेदारांचे योगदान आणि आजची स्थिती हे परस्परांपेक्षा वेगळे आहेत. कौशल्यपुर्ण मनुष्यबळ कमी होऊन कौशल्यपुर्ण उत्पादन मोठया प्रमाणात व कमी वेळेत करून देणा—या मशीन्स आल्या त्यामुळे मनुष्याच्या हाताचे काम कमी झाले व समाजात

बेकारी,दारीद्रय,उपासमार या नवनवीन संकल्पना अस्तित्वात आल्या. वाढते शहरीकरण थांबविण्यासाठी आणि उघोगांना ग्रामिण भागात वळविण्याकरीता तसेच ग्रामिण भागात रस्ते, विज, पाणी, दळणवळण, बॅंक आणि पोश्टाच्या सुविधा गरजेनुसार उपलब्ध करून देण्याची आवश्यकता असताना ग्रामिण भागात अपवादात्मक परिस्थिती निदर्शनास येते. केंद्र सरकार, राज्य सरकार आणि जिल्हा परिषद यांच्या विविध योजना कार्यरत असताना दारीद्रय निर्मूलनाचे प्रयोग अयशस्वी झाल्याचे दिसून येते. मोठया प्रमाणात आर्थिक तरतूद करून हाती घेतलेल्या योजना असताना दारीद्रय रेषेखालील लोकसंख्या ,उपासमार, टॅंकरव्दारे पाणी पूरवठा, शैक्षणिक दर्जा आणि मुख्य पायाभूत सुविधांचा अभाव प्रकर्षाने लक्षात येतो.

***निष्कर्ष:***

प्रस्तूत निबंधाचे निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

1. प्राचिन ते अधूनिक काळात बलूतेदारी पध्दतीचे स्थान आणि योगदान महत्वाचे होते.
2. स्वातंत्र्योत्तर काळात बलूतेदारीच्या पध्दतीचा –हास होत असल्याचे निदर्शनास येते.
3. बलूतेदारांची पुढची पिढी परंपरागत व्यवसाय करण्याची ईच्छा व्यक्त करीत नाहीत त्यांचा कल हा परंपरागत व्यवसाया पेक्षा नोकरी करण्याकडे दिसून येतो. क्वचितच ग्रामिणभागात बलूतेदार आपला व्यवसाय परंपरागत पध्दतिने करत असल्याचे निदर्शनास आले .

***संदर्भसूची*** :–

1. भारतीय संस्कृतिकोश सहावा खंड
2.देगलुरकर गो.ब., ढवळीकर म.के., गायकवाड श.सा. प्राचीन भारत,इतिहास आणि संस्कृती,पॉप्युलर प्रकाशन पुणे
3.देशमुख गो.ह. ग्रामरचना, त्यातील व्यवस्था आणि त्याची हल्ली परिस्थिती, 1883
4.त्रंबक नारायण अत्रे ,गावगाडा 1912